तरुण भारत

शुक्रवार, दि. २७ मे २०१६

# बँक चालण्यासाठी चांगल्या कर्जदारांची आवश्यकता

## सुधाकरपंत परिचारक : लक्ष्मी, समर्थ सहकारी बँकेस आदर्श बँकेचा पुरस्कार



आदर्श बँक पुरस्कार वितरणप्रसंगी माजी आ. सुधाकरपंत परिचारक, आ. बबनराव शिंदे, कल्याणराव काळे, बी.टी. लावंड आदी.

**त.भा.वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २६ मे**

सद्या चांगले ठेवीदार मिळण्यापेक्षा चांगले कर्जदार मिळणे अवघड आहे,चांगले कर्जदार मिळणे आवश्यक आहे. आज सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक को ऑप असोसिएशनची सोलापूरात स्वताची इमारत आहे त्यांचा कारभार व्यवस्थितपणे सूरू आहे ही बाब आजच्या काळात चांगली आहे असे प्रतिपादन माजी आ सुधाकरपंत परिचारक यांनी केले.

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक को - ऑप असोसिएशन सोलापूर आयोजित आदर्श बँक व आदर्श मॅनेजर पुरस्कार वितरण गुरूवारी शिवस्मारक सभागृहात करण्यात आला. यावेळी सुधाकरपंत परिचारक बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आ.बबनदादा शिंदे, जिल्हा उपनिबंधक बी.टी. लावंड, असोसिएशनचे अध्यक्ष राज मिणियार, उपाध्यक्ष राजगोपाल झंवर, मोहन दाते उपस्थित होते.

नागरी बॅंका ग्राहकांना चांगली सेवा देत आहेत त्यांच्या चांगल्या कामाची पावती म्हणून हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. सोलापूरात ३४ बँका आहेत त्यातील ३१-३२ बँका चांगल्या स्थितीत आहेत व या बँकात जवळपास सहा हजार कोटीच्या ठेवी लोकांनी ठेवल्या आहेत. नागरी बँकाना सद्या काम करणे अवघड आहे कारण राज्य सरकारचे नियम तसेच आरबीआय चे नियमांची बंधने खूप आहेत. आज वीस पैकी अठरा बँकेत निवडणुका बिनविरोध झाल्या आहेत. आज बँकातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची गरज असुन वसुली चांगली तरच बँक सुरळीत चालते असे जिल्हा उपनिबंधक लावंड म्हणाले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते आदर्श बँक पुरस्कारचे व आदर्श मॅनेजर पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यात आदर्श मॅनेजर पुरस्कार समर्थ बँकेचे मॅनेजर उमेश थोब्बी यांना देण्यात आला तर आदर्श बँक तृतीय पुरस्कार सदगुरु गहिनीनाथ अर्बन बँक अकलूज, माढेश्वरी अर्बन डेव्ह बँक माढा, दि लक्ष्मी बँक सोलापूर यांना देण्यात आला तर आदर्श बँक व्दितीय पुरस्कार ५० कोटीपर्यंत गटात विभागून कृषिसेवा अर्बन को ऑप बँक व शरद नागरी बँक तर १५० कोटी पर्यंत गटात शिवशक्ती अर्बन बँक बार्शी व विद्यानंद को ऑप बँक सोलापूर तर ५०० कोटीपर्यंत गटात मनोरमा बँक व विकास सह बँक तसे ५०० कोटीपेक्षा जास्त गटात सोलापूर जनता सह बँक व दि पंढरपूर अर्बन को ऑप बँक यांना विभागुन देण्यात आले

तर आदर्श बँक प्रथम पुरस्कार ५० कोटीपर्यंत निशिगंधा बँक व १५० कोटीपर्यंत सांगोला अर्बन बँक सांगोला तसेच ५०० कोटीपर्यंत लोकमंगल बँक सोलापूर तर ५०० कोटीपेक्षा जास्त ठेविची समर्थ सहकारी बँक सोलापूरला आदर्श बँकेचा प्रथम पुरस्कार मिळाला.